" महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी नेत्यांच्या प्रभावाचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

बालाजी भारत राठोड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विश्वाबंर धर्मा गायकवाड

राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी कॉलेज, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज , नांदेड

ता. नांदेड. जी. नांदेड

डिसेंबर - २०२२

“ महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी नेत्यांच्या प्रभावाचा विश्लेशनात्मक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा "

प्रस्तावना

१९७३ पासून भारतीय राजकारणातील जात आणि राजकारण यांच्यातील परस्पर संचामध्ये मागास जाती समुहाच राजकारण सर्वात महत्वाचे बनलेले दिसते. या राजकारणास 'ओबीसी' या नावाने ओळखण्यास येऊ लागले. उत्तर भारतातील १९७० नंतर बिगर क्षत्रिय व मागास जाती त्याच्याकडे असणाऱ्या जमीन मालकीच्या आधारे आर्थिकदृष्ट्या प्रगल्भ बनल्या. लोकसंख्या व आर्थिक स्थितीच्या आधारे राज्याच्या मध्यवर्ती आलेल्या दिसतात. त्यात प्रामुख्याने अतिर, जाट, पाटव, कुर्मी, रावत पाटीदार इत्यादी या जातीनी राजकारणातील त्यांचे स्थान उंचावले आहे. महाराष्ट्रात या धरतीवर काही प्रमाणात माळी, धनगर, वंजारी व या जातीनी त्याच्याकडे असणारी जमीन मालकी आधारावर आर्थिक गतिशीलता तयार झाली आहे. आर्थिक गतिशीलता व मतदारसंघ पातळीवरील लोकसंख्या या आधारावर मराठा वर्चस्वशाली जातीच्या राजकारणाला शह देत तर कधी समन्वयातून पुढे आले आहेत.

१९८० नंतर जातीच्या आधारे नव्याने सामाजिक शक्ती उदयाला येण्यास सुरुवात झालेली दिसते. या समाजिक घटकांना दोन घटकांनी मोठा हातभार लावलेला आहे. एक म्हणजे प्रादेशिक पक्ष दुसरे म्हणजे ओबीसी व तत्सम संख्येने असलेल्या जाती. हे दोन घटक पूर्वी देखील राजकारणात कार्यरत होते. मात्र काँग्रेस

पक्ष हा मजबूत असल्याने या घटकांचे अस्तित्व जाणवत नव्हते. पण जसा जसा काँग्रेस पक्ष कमकुवत होत गेला तसे तसे हे दोन घटक राजकारणात पुढे आलेले दिसतात. जातीचे प्रादेशिक पातळीवर नवे राजकारण, प्रादेशिक घटकाच्या आधारावर प्रादेशिक पक्षाचा उदय, आघाडीची समिश्र सरकारे, राष्ट्रीय पक्षांनी देखील प्रादेशिक पक्षाप्रमाणे जातीवर आधारित संघटन करण्यास सुरुवात झाली.

प्रत्येक जातीनी स्वतःच्या राजकीय पक्षांची स्थापना करुण्याबरोबर समाज संघटनेच्या माध्यमातून जातीचा राजकीय आविष्कार आणि राजकीय कार्यक्षेत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थात प्रादेशिक पक्ष, जात व संघटना या दोन्ही माध्यमातून निवडणुकांच्या राजकारणात भारतातील वेगवेगळ्या राज्यात प्रस्थापित जातींना आव्हाने आणि स्पर्धा निर्माण होत गेली. अगदी छोटी जातही स्वतःची संघटना स्थापन करून सौदेबाजी करत किंवा दबावाच्या पातळीवर आव्हाने निर्माण करत आहेत.

भारतीय राजकारणात ओबीसी राजकारणाचा प्रश्न सत्ता, अधिकार आणि स्वतंत्र राजकारण आशेने पुढे आला आहे. ओबीसी राजकारणाने देशपातळीवरील राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय राजकारणात गेल्या काही वर्षापासून ओबीसी समाज घटकांतील नेतृत्व उच्च जातीच्या नेतृत्व सहकार्याने तसेच स्वतंत्र राजकारण करत किंवा उच्च जात नेतृत्व विरोध करत पुढे येण्याचा प्रयत्न करत आहे. तर काही राज्यात स्वतंत्र राजकारण करत पुढे आलेले दिसते. तर सर्व राजकीय पक्षाकडून ओबीसी समाज घटकांचा पाठिबा मिळवण्याचा प्रयत्न

चालवलेला आहे. त्यातून निवडणुकीच्या राजकारणात सामाजिक समतोल साधण्यासाठी जातीच्या राजकारणाला महत्व आले आहे.

मंडल आयोगाच्या नंतरचे दोन दशकाने भारतीय राजकारणातील जीवन आणि राजकारण या दोन घटकांनी व्यवस्थितरीत्या स्थान घेतलेले आहे. १९९० च्या मंडल आयोगाचा प्रकल्प हा फक्त राज्यांची धोरणे आणि त्या धोरणातील फायदे मागास जातींनाच मिळावेत असा नव्हता तर तो एक प्रकारे जातीच्या राजकारणातील गणितांचाही परिपाक होता. त्यामुळे मागास जातींना जास्त फायदे मिळावेत यापेक्षा राजकारणात जास्त फायदा कसा होईल असे पाहण्यात आले होते. मंडल आयोगद्वारे कल्पिलेल्या जातीच्या जाणीवेतील 'ओबीसी' आणि राजकीय जाणिवेतील 'ओबीसी' वर्गवारी अशा दोन्ही वर्गवारीचा पुढे जाण्याचा प्रयत्न झालेला नव्हता. तर समकालीन काळातील वर्चस्वशाली असलेल्या जातींना राजकारणात आणि विचार प्रणालीच्या चौकटीमध्ये आव्हान कसे निर्माण करता येईल यादृष्टीने काम केलेले होते.

मंडल आयोगापासून देश पातळीवर राजकारणाचे विश्व बदलले आहे. समाज रचना, जातीचे स्थान, जातीकडे असलेले आर्थिक सुलभता, निर्माण झालेली राजकीय जाणीव अशा विविध प्रकारे घटक राजकीय दृष्ट्या राजकारणात पुढे आले. भारतीय राजकारणात प्रथम जनता दलाने मागास जातीचे प्रतिनिधित्व करत असल्याचे जाहीर केले होते. परंतु मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, नीतीशकुमार हे जनता दलातून बाहेर पडले. त्यांनी स्वतंत्र राजकारण करण्यावर भर

दिला. त्याचवेळी भाजपाने राज्या राज्यातून जाणीवपूर्वक 'सोशल इंजिनिअरिंग' या नावाखाली मागास जातीतून नेतृत्व पुढे आणण्यात आले. काँग्रेसने या प्रक्रियेला संथगतीने प्रतिसाद दिलेला दिसतो. मात्र कोणता पक्ष मागास समाज घटकाला किती उमेदवारी देतो आणि किती उमदेवार निवडून आणतो यावर खरी कसोटी होती. या सर्वांची चर्चा वेगाने पुढे आलेली दिसते. याचाच एक भाग असा दिसतो की महाराष्ट्रातून व मध्य प्रदेशातून ओबीसी नेतृत्व भाजपातून पुढे आलेले दिसते. उदा. महाराष्ट्रात सेना-भाजपाकडून तर मध्य प्रदेशात देखील भाजपाकडून नेतृत्व पुढे आले आहे. काँग्रेसने देखील ओबीसींना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

समस्यासूत्रण

संशोधनकार्यात संशोधन समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन ससस्या निवडणे आवश्यक असते. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने लातूर तालुक्यामध्ये ओबीसी नेतृत्वाचा अभ्यास करण्यासाठी " महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी नेत्यांच्या प्रभावाचा विश्लेशनात्मक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा " हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. लातूर जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२. नेतृत्वाच्या जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३. लातूर जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे.

४. लातूर जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील ओबीसी नेतृत्वाचा अभ्यास करणे.

५. लातूर जिल्ह्याच्या विधिमंडळीय निवडणुकीमधील ओबीसी नेतृत्वाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. लातूर जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.

२. नेतृत्वाच्या जडणघडणीमध्ये जात, धर्म, संपत्ती, गुण इत्यादी महत्वपूर्ण ठरतात.

३. लातूर जिल्ह्याच्या राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव राहिलेला दिसून येतो.

४. लातूर जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील ओबीसी नेतृत्व मिळालेल्या राजकीय आरक्षणामुळे पुढे येत आहेत.

५. लातूर जिल्ह्याच्या विधिमंडळीय निवडणुकीमधील ओबीसी नेतृत्व पुढे न येण्यास मराठा जात कारणीभूत आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व

देशाला स्वतंत्र मिळून ७५ वर्ष पूर्ण झाले आहेत. भारतात जवळपास ६० टक्के संख्या ओबीसी समाजाची आहे. गेल्या ७५ वर्षातसुद्धा ओबीसी समाजाला

विधिमंडळ व संसदीय पातळीवर समान संधी मिळाली नाही. स्थानीक स्वराज्य संस्थेतील आरक्षणामुळे काही प्रमाणात ओबीसींना संधी मिळाली आहे. परंतु विधिमंडळ व संसदीय निवडणुकीत ओबीसींना आरक्षणाची तरतूद नसल्यामुळे त्यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही. प्रस्तुत संशोधन विषय लातूर जिल्ह्याशी संबंधित असल्यामुळे लातूर जिल्ह्यातील २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले आहे का? या मिळाले नसेल तर त्यांचे प्रमुख कारणे कोणते आहेत? या संदर्भात अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्यावहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहारांशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक असून क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा. वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नाहीत. या

संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थळकाळपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधन मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी स्तंभालेख, वर्तुळ या सांख्यिकीय अभ्यास पद्धतीचासुद्धा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरु होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी नेत्यांच्या प्रभावाचा विश्लेशनात्मक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा "

या विषयाच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व विधिमंडळीय निवडणुकीचा अभ्यास करणे ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने इतरकी काही संदर्भ येऊ शकतात.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन विषय मूलभूत संशोधनात येत असल्यामुळे संशोधन कार्यासाठी माहितीची जमवाजमव करण्याच्या उद्देशाने द्वितीय स्त्रोताचा उपयोग केला आहे. यामध्ये राजकीय विश्लेषणासाठी विधानसभा निवडणूक निवडणुकीचे अहवाल, शासकीय अहवाल, प्रकाशने, खाजगी संस्थाचे प्रकाशने, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा

संशोधनाला व्यवस्थित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधन विषयाची विभागणी विविध प्रकरणांत पुढीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : लातूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे : राजकीय नेतृत्वाची संकल्पना

प्रकरण चौथे : लातूर जिल्हयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसींचा सहभाग

प्रकरण पाचवे : लातूर जिल्हयातील विधिमंडळीय निवडणुकीत ओबीसींचा सहभाग

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ

१. वाघमारे जे. एम., सामाजिक न्याय संकल्पना आणि सिध्दी, न्याय विशेषांक, कुंभार नागोराव (संपा), विचारशलाका (त्रैमासिक) अंक १ प्रबोधन प्रकाशन, लातूर, जुलै १९८७

२. भोळे भा. ल. विसावे शतक आणि भारतातील समता विचार आंबेडकर अकादमी, सातारा, जून १९९९, पृ.७६-७७

३. आंबेडकर गो. आर, शूद्र पुर्वी कोन होते खैरमोडे चा. भा., सुगाता प्रकाशन, नागपूर, १९७४

४. पाटील शरद, शोध मूलनिवासींचा की, शूद्र वर्णाचा की, जात्यन्तक समतेचा?, मावळाई प्रकाशन, शिरूर, जि. पुणे २००८

५. मिरजकर शामसुंदर, ब्राह्मणी विषमतेच्या विरोधात समतावादी नागनालंदा प्रकाशन, आष्टा, २००३

६. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक मंडळ, अभय कांता, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, प्रकाशक, नर्मदा आफसेट, पुणे

७. तुकाराम जाधव-संपादक, महाराष्ट्र वार्षिकी २०१५, प्रकाशन, युनिक ॲकॅडमी पुणे,

८.सी.एस.डी.एस.ची आकडेवारी सुहाय पळसीकर, द इंडियन एक्सप्रेस आणि चाणक्यची आकडेवारी

९. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती

१०. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३

११. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे

१२. www.wikipedya.org

संशोधक

बालाजी भारत राठोड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विश्वाबंर धर्मा गायकवाड

राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी कॉलेज, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर